हैं तय्यार हम...

मी धावणार माझ्यासाठी

Aurangabad Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
11 Dec 2016

In association with SAFFRON LANDMARKS

Powered by MK CONSTRUCTIONS CREATIONS FOR LIFETIME

आम्ही लोकमत औरंगाबाद हाफ मॅरेथॉन अभिनव इंटरनॅशनल स्कूल व किडस् कॅपिटल इंग्लिश स्कूलचे सर्व पदाधिकारी व शिक्षकवृंद विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व निरोगी आरोग्यासाठी सहभागी होत आहोत.

-डॉ. विजय वाडकर (संचालक- अभिनव इंटरनॅशनल स्कूल व किडस् इंग्लिश स्कूल)

अभिनव इंटरनॅशनल स्कूल... (डावीकडून उभे) प्रेमलता शेजूळ, राखी यादव, वैशाली पाटील, वैशाली गावंडे, रुपाली चारठाणकर, मानसी वाडकर, विजय वाडकर, सुरेखा काकडे, रुपाली चिखले, वंदना सपकाळ, वंदना शर्मा, अनिता बोचरे, प्रियंका शिंगारे, पूजा गायकवाड, (डावीकडून बसलेले) आम्रपाली कस्तुरे, स्वाती उराडे, सविता डिडोरे, सविता वाघ, वैशाली कुलकर्णी, विद्या हेबाडे, किरण परदेशी, सोनाली चव्हाण, शिवानी गायकवाड, रुपाली गाजरे, करुणा थोरात.

चॅम्पियन रनिंग क्लब... (डावीकडून उभे) दिनेश विभुते, यास्मिन शेख, बरकत खान, मोहम्मद शाफे, प्रीती जाधव, शेखर ताठे, निरुपमा नागोरी, हर्षदा आजगावकर, सौरभ गुप्ता, डॉ. सुजाता लाहोटी, मनीष पुराणिक, हेलिना विराणी, विजय जाधव, उज्ज्वला दहिफळे, मिस्बाह खान, राही काचोळे, दीप्ती खेमका, मनीष सोनी, गौरी देशपांडे, शीतल म्हस्के, शिवाजी पोले, विष्णू घुले, धनंजय पळशीकर, इम्रान इनामदार (डावीकडून बसलेले) संदीप कुंभार, अमन कपूर, असदउल्ला शेख, परवेज विराणी (ग्रुप ट्रेनर), सय्यद आरेफ अली, वैभव मेश्राम, सतीश येवले, विवेक धावणे.

Co-Sponsors

RAJURI STEEL | SARA INSPIRED BY YOU | श्री धनेश्वरी शैक्षणिक संकुल (स्थापना वर्ष : १९९५, मेहबाई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद) | VANSH GROUP REALITY BEYOND EXPECTATION

Powered by: YOU TOO CAN RUN | Health & Fitness Partner: RELAX-ZEAL | Mall Partner: PROZONE LIFE BEGINS HERE | Food Partner: KREAMN KRUNCH | Outdoor Partner: abhishek advertising & marketing (I) pvt.ltd | Partner: शिव

नाव नोंदणी व सहभागासाठी

www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४०-६६०४५०२

'काहूर व टाहो' वर आज चर्चासत्र

औरंगाबाद : कवी सुदाम मगर यांच्या 'काहूर' व 'टाहो'या दोन कवितासंग्रहांवर दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारी २ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्रात चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. तसेच कविसंमेलनही होणार आहे.

सूर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विजयकुमार गवई हे राहतील. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. संजय मून, डॉ. उत्तम अंभोरे, डॉ. प्रतिभा अहिरे, डी. बी. जगत्पुरिया हे आपली मते मांडतील. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सुधीर गव्हाणे, प्रा. रेखा मेश्राम, के. एस. अतकरे यांची उपस्थिती राहील. नंतर प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सुदाम मगर, प्रा. भारत शिरसाट, रतनकुमार साळवे, अमरदीप वानखेडे, देवानंद पवार आदींनी केले आहे.



मोफत जवळचा चष्मा

निःशुल्क डोळ्यांची तपासणी

20 नोव्हेंबर 2016
सकाळी 10 ते सायं. 6 वाजेपर्यंत

EYE Q आय-क्यू सुपर स्पेशालिटी नेत्र रुग्णालय

1st फ्लोर, साई बिझनेस सेंटर, 7 हिल्स फ्लायओव्हर, यशोदीप हॉटेलजवळ, औरंगाबाद | 0240-6600443

मोतिबिंद | रेटिना | लेसिक | काचबिंद | जनरल आय चेकअप | औषधे | ऑप्टिकल्स

सर्वसाधारण सभा : महानगरपालिका वाढविणार उत्पन्न

लीजच्या ३४ जागा रद्द

औरंगाबाद : मनपाच्या मालकीच्या जागेवर लीज पद्धतीने दिलेल्या ३४ जागांचे करारनामे रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय शनिवारी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला. कोट्यवधी रुपयांच्या या जमिनी नाममात्र भाडेतत्त्वावर विविध संस्था, संघटनांना दिल्या होत्या. करारनामे रद्द केल्यानंतर आता नव्याने करण्यात येणारे करारनामे हे रेडीरेकनर दराने करण्यात येणार आहेत. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात भरमसाठ वाढ होणार आहे.

मनपा प्रशासनाने सर्वसाधारण सभेत ऐनवेळी हा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावात एकूण ३६ जागांचा समावेश आहे. ५० रुपयांपासून ते ४७,६७७ रुपये प्रतिचौरसमीटर दराने भाडेतत्त्वावर या जागा देण्यात आलेल्या आहेत. यात ७ जागा नाल्यावरील आहेत. १० जागा ९९ वर्षांसाठी, ३ जागा ९० वर्षांसाठी, १७ जागा ३० वर्षांसाठी, ३ जागा ५ वर्षांसाठी आणि १ जागा ११ महिन्यांसाठी भाडेतत्त्वावर देण्यात आलेली आहे. या सर्व ३६ जागेपोटी मनपाला एकूण ५ लाख ७९ हजार ३६० रुपये वार्षिक उत्पन्न मिळत होते.

रेडीरेकनर दरानुसार भाडे आकारण्यात आल्यास दरवर्षी मनपाला ५ कोटी ९० लाख ५६ हजार ४२८ रुपये मिळतील, असा अंदाज आहे.

सभागृह नेते राजेंद्र जंजाळ, नंदकुमार घोडेले, राजू वैद्य, राज वानखेडे यांनी यावेळी मुद्दा मांडला की, ज्या जागा सामाजिक संस्थांनी सामाजिक कार्यासाठी घेतलेल्या आहेत त्यांचे भाडे वाढविणे योग्य नाही. शिवाई ट्रस्टला देण्यात आलेल्या जागेचे भाडे वाढविण्यात येऊ नये. मराठा सेवा मंडळाच्या कार्यालयाची जागाही यातून वगळण्याचा निर्णय महापौर त्र्यंबक तुपे यांनी घेतला.

ज्यांचे करार रद्द झाले त्या संस्था

हाजी नूर, इस्माईल कुरैशी, जुलैखा कुरैशी, हसीनाबी अजीम खान, कौसर यासीन, मोहन बोंबले (समर्थनगर), बाईसाहेब प्रयागधाम ट्रस्ट (गोविंदनगर), मिर्झा मुस्तफा बेग (जाफरगेट), एस. एम. खान (रेल्वेस्टेशन), मधुकर येंझे (जाफरगेट), ढोकरजी, चेत्राम पुलवडे (चुडी बाजार), मुरलीधर गवळी (एस. बी. कॉलनी), पृथ्वीराज पवार (सिद्धार्थ गार्डन), समर्थ कृपा संस्था (गारखेडा), साप्ताहिक पोलीस टाइम्स (समर्थनगर), एमएसईबी (पन्नालालनगर), आनंदीबाई गादिया (बारुदगरनाला), जीवन कला मंडळ (न्यू समर्थनगर), औषधी भवन (दलालवाडी), राणी लक्ष्मीबाई कल्याण मंडळ (निजामोद्दीन दर्गा), सुरजितसिंग खुंगर (उस्मानपुरा), प्रेसिडेंट, सारंग सोसायटी (गारखेडा), छत्रपती शाहू टेक्निकल इन्स्टिट्यूट (नंदनवन कॉलनी), सर्व्हे क्र. ५४ क्रांतीचौक येथील पाच भाडेकरु.

प्रेझेंटेशनने उलगडले गणिताचे कोडे

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात आयोजित इन्स्पायर शिबिरामध्ये प्रा. एम. डी. लगड यांनी विद्यार्थ्यांसमोर प्रेझेंटेशनच्या माध्यमातून गणिताचे कोडे उलगडून दाखवले.

इन्स्पायर शिबिराच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांना बौद्धिकांसह ग्रंथांचे दर्शन घडविण्यात आले, तर शेवटच्या सत्रात 'मी सुंदर कसा होणार' यावर डॉ. स्वाती सुरडकर यांनी मार्गदर्शन केले. सुरुवातीला प्रा.एम.डी. लगड यांनी विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी असणारी भीती प्रेझेंटेशनच्या माध्यमातून दूर केली. 'आयक्यू'साठी लागणारी टेक्निक्स समजावून सांगितली. डॉ. सुनील पिल्लाई यांनी वाईल्ड लाईफची माहिती देताना जंगलात वाघ, हत्ती, पक्षी आदी वन्यजिवांचे जीवन उलगडून दाखवले. शेवटच्या सत्रात ग्रंथपाल डॉ. धर्मराज वीर यांनी ग्रंथालयातील पुस्तकांच्या माहितीसह संशोधनातील ग्रंथांचे महत्त्व समजावून सांगितले. मॉडर्न ग्रंथालय, ग्रंथ कसे शोधावेत? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे आज कीर्तन

कडा मैदान : झुंजार वैष्णव वारकरी मंडळाचा उपक्रम

औरंगाबाद : झुंजार वैष्णव वारकरी प्रबोधन मंडळातर्फे लोकमतचे एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा यांच्या वाढदिवसानिमित्त २० नोव्हेंबर रोजी गजानन महाराज मंदिराशेजारील कडा ऑफिस मैदानावर सायंकाळी ६.०० ते ९.३० यावेळेत समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांच्या हरिकीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या एक तास अगोदर ह.भ.प. प्रभाकर कुटे यांचा भारुडाचा कार्यक्रम होणार आहे.

काँग्रेसचे सिडको-हडकोचे ब्लॉक अध्यक्ष बबन डिडोरे व मित्रमंडळातर्फे मागील १८ वर्षांपासून या हरिकीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. हरिकीर्तनाचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन संयोजक बबन डिडोरे यांच्यासह भोलेश्वर भजनी मंडळ, भोलेश्वर गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह काशीनाथ जाधव, रमेश दिसागज, भिकन म्हात्रे, वामन ओळेकर, निवृत्ती कोंडके, ज्ञानेश्वर साठे, बाबासाहेब द्वारकुंडे, अनिल खंबाट, रघुनाथ हिवाळे, संजय पवार, उद्धव सावरे, नसीर पटेल, बाळासाहेब मुठाळ, अमोल मनगटे, सुनील मगर, बाळासाहेब खरात, डी. डी. गव्हाड, भानुदास जाधव, साहेबराव म्हस्के, रमेश गेंदे, विशाल डिडोरे, अजय डिडोरे, महेबूब बागवान, सुदाम देहाडे, प्रवीण गोरे, अतुल औताडे, व भानुदासनगर मित्रमंडळाने केले आहे.

मन:शांतीसाठी कीर्तन

आजच्या जीवनात प्रत्येकाला खडतर प्रसंगाला सामोरे जावे लागत आहे. दु:खी व पीडितांना जीवनात समाधान व मन:शांती लाभावी यासाठी हरिकीर्तन हा पर्याय आहे.

दोन दुचाकींची टक्कर; एक ठार

औरंगाबाद : दोन दुचाकींमध्ये टक्कर झाल्याने दुचाकीस्वार चार जण जखमी झाले होते. यातील एका कामगाराचा उपचारादरम्यान शनिवारी सायंकाळी घाटी रुग्णालयात मृत्यू झाला. दोन जणांची प्रकृती गंभीर असून, त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. चिकलठाणा येथील पोलीस चौकीसमोर शुक्रवारी रात्री हा अपघात झाला.

बाबासाहेब ऊर्फ सुभाष गोविंदराव बनकर (४०, रा. चिकलठाणा) असे मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. बाबासाहेब हे शनिवारी रात्री १०.२० वाजेच्या सुमारास त्यांच्या सहकाऱ्यांसह दुचाकीने जात असताना चिकलठाणा पोलीस चौकीजवळ समोरुन वेगात आलेल्या दुसऱ्या दुचाकीस्वारासोबत त्यांची टक्कर झाली. या अपघातात दोन्ही दुचाकीवरील चार जण जखमी झाले. जखमींची नावे समजू शकली नाही. जखमींपैकी दोन जणांची प्रकृती गंभीर आहे. बनकर हे चिकलठाणा येथील कंपनीत कामगार होते. २० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ चिकलठाणा स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार होईल.

काँग्रेसचे इंदिरा गांधी यांना अभिवादन

औरंगाबाद : देशाच्या माजी पंतप्रधान दिवंगत इंदिरा गांधी यांना आज जयंतीनिमित्त औरंगाबाद जिल्हा व शहर काँग्रेसतर्फे गांधी भवनात अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष नामदेव पवार, प्रदेश काँग्रेसचे सचिव अशोक सायन्ना यादव, जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष डॉ. कल्याण काळे, शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सरोज मसलगे पाटील यांची भाषणे झाली.

जिल्हा सरचिटणीस किरण पाटील डोणगावकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उपस्थितांनी इंदिराजींच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. 'आज देशात अभूतपूर्व आर्थिक आणीबाणी निर्माण झाली आहे. अशा वेळी कणखर व सर्वसामान्यांसाठी ठोस निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या महान नेत्या म्हणून इंदिरा गांधी यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही, असे उद्गार नामदेव पवार यांनी यावेळी काढले.

रवींद्र काळे, विलास औताडे, बाबा तायडे, नितीन पाटील, अतिश पितळे, शेख अथर, इब्राहिम पटेल, इब्राहिम पठाण,भाऊसाहेब जगताप, काकासाहेब कोळगे, अर्चना मुंदडा, हेमा पाटील, उज्ज्वला दत्त, शशिकला मगरे, सलमा नाहीद, सुनीता निकम, मृणाल कुलकर्णी, सुहासिनी घोरपडे, सुनीता कोरडे, शैला जायभंग, कैसरबाबा, जयपाल दवणे, दगडू खडसन, किशोर ढेपे, प्रसाद साळवी, प्रदीप शिंदे, मुद्दसर अन्सारी, हरचरणसिंग गुलाटी,चंद्रकांत बनसोडे, के. ए. पठाण, दिगंबर झगडे, गंगाधर थोरात, मजहर पटेल, शिवदास पाटील,मारुती रसाळ, सय्यद मोईनोद्दीन, उत्तम दणके, मोईन कुरेशी, खालेद पठाण, योगेश मसलगे, सुदाम देहाडे, शिरीष चव्हाण, भास्कर वानखेडे, चक्रधर मगरे, हाजी तनवीर फारुकी,बाबूराव पाटील काळे, राहुल सावंत, एम. ए. अजहर, शकील पटेल, बाबूराव कवसकर, सैफ फेरोज खान, ॲड. शांतीलाल छापरवाल आदींची यावेळी उपस्थिती होती.

गांधी भवनात शनिवारी इंदिरा गांधी यांना अभिवादन करताना पदाधिकारी.

छावणी येथेही अभिवादन

- शांतीपुऱ्यातील खुले रंगमंच येथे पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमास वैशाली निकाळजे, सुहासिनी अवचिते, नेहा निकाळजे, ज्युली राव, सुरेखा निर्मळ, रागिणी गवळे, ज्योत्स्ना वडागळे, इंदूबाई बत्तीसे, जैन अमोलिक, रिबेका रणनवरे, शोभा घाडगे, पुष्पा वाघमारे, प्रमिला घुमारे आदींची उपस्थिती होती.

यशस्वी होण्यासाठी चांगले ध्येय ठेवा -प्रल्हाद पै

वाळूज महानगर: जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगली ध्येय डोळ्यासमोर ठेवली पाहिजेत, असे प्रतिपादन जीवन विद्या मिशनचे गुरु प्रल्हाद वामनराव पै यांनी शनिवारी बजाजनगरात आयोजित 'सुखाचा पासवर्ड' या विषयावर मार्गदर्शन करताना केले.

सिध्दी विनायक गणेश मंदिरात जीवन विद्या मिशन व तनवाणी विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा खरा शिल्पकार' अर्थात 'सुखाचा पासवर्ड' या विषयावर प्रल्हाद पै यांचे व्याख्यान झाले. ते की, सर्व कोनामध्ये त्रिकोण हा सर्वात मजबूत असतो. हा त्रिकोण म्हणजे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा त्रिवेणी संगम आहे. विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी शिक्षकांबरोबरच पालकांनीही जबाबदारी स्वीकारण्याची गरज आहे. मानवी जीवनाला आकार देण्यात विचारशक्ती ही निर्णायक असते. ज्ञानार्जन करताना विद्यार्थ्यांनी विचार मोठा व व्यापक ठेवावा. राष्ट्राच्या उभारणीसाठी पालक व शिक्षकांनी तरुण पिढीकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. जीवनात यशस्वी होण्यासाठी बुध्दी, मन व शरीराचे सामर्थ्य वाढविणे आवश्यक असल्याचे पै यांनी विविध उदाहरणे व गोष्टी सांगून पटवून दिले. आपल्या आयुष्याला आकार देण्यासाठी विद्यार्थिनी सोशल मीडिया, व्यसन व वाईट संगतीपासून दूर राहावे, असा सल्लाही त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी नशिबावर अवलंबून न राहता तसेच शॉर्टकटपासून अलिप्त राहून अभ्यास व परिश्रम करुनच जीवनात यशाचा मार्ग शोधण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

खा. चंद्रकांत खैरे, तनवाणी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष हनुमान भोंडवे, सरपंच महेश भोंडवे, बप्पा दळवी, अर्जुन आदमाने, आय.जी.जाधव, विजय उखळे आदींच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी आ. संजय शिरसाठ, उमेश पागम यांची उपस्थिती होती. तृप्ती पराडकर यांनी सूत्रसंचालन केले.

बजाजनगरातील सिद्धीविनायक मंदिरात 'सुखाचा पासवर्ड' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रल्हाद वामनराव पै व ऐकण्यासाठी उपस्थित जनसमुदाय.

सर्व व्यवहार बँकेद्वारे; कर भरुन 'अपडेट' रहा

सीएचा सल्ला : जिल्हा व्यापारी महासंघाच्या चर्चासत्राला मोठा प्रतिसाद

औरंगाबाद : काळा पैसा बाळगणाऱ्यांना आता कायद्यातून कोणतीही 'पळवाट' राहिलेली नाही. नोटाबंदीकडे सकारात्मकतेने पाहावे. आता आलेल्या संकटातून कसे बाहेर पडावे ही पहिली पायरी व परत या संकटात सापडू नये यासाठी सर्व व्यवहार बँकेद्वारे करावेत. सर्व कर भरुन स्वत: अपडेट राहावे, असा व्यावहारिक मौलिक सल्ला नामांकित चार्टर्ड अकाऊंटंटने दिला.

जिल्हा व्यापारी महासंघ, सी. ए. असोसिएशन व कर सल्लागार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चर्चासत्र गाजले. 'पाचशे व हजार रुपयांचे चलन रद्द केल्यामुळे त्याचे परिणाम' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. शनिवारी दुपारी रेल्वेस्टेशन औद्योगिक वसाहतीतील टी.पी.ए. हॉलमध्ये चर्चासत्रासाठी जिल्हाभरातील व्यापारी संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व व्यापारी आले होते. सी.ए. अलोक सिंग यांनी केंद्र सरकारचा उद्देश व त्यानंतर मागील ११ दिवसांत नियमात करण्यात आलेले बदल याची माहिती दिली. सी.ए. उमेश शर्मा म्हणाले की, किसी को 'कॅश इन हँड'ची मोहब्बत जादा चढा तो किसी को कम' असे त्यांनी म्हणताच हास्य पिकले. काळेधन बाळगणाऱ्यांना आता कोणत्याही पळवाटा राहिल्या नाहीत. यामुळे सर्व व्यवहार बँकेद्वारे करण्याची सवय लावून घ्यावी लागेल. नोटाबंदीकडे सकारात्मकतेने पाहावे. आता आलेल्या संकटातून कसे बाहेर पडावे ही पहिली पायरी व परत या संकटात सापडू नये यासाठी सर्व व्यवहार बँकेद्वारे करुन सर्व कर भरुन स्वत: अपडेट राहावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

'बँकेत किती रक्कम जमा करावी, याचे कोणतेच बंधन रिझर्व्ह बँकेने घातले नाही. मात्र, भरलेली रक्कम कुठून आणली याचे उत्तर देण्याची त्या व्यक्तीला तयारी ठेवावी लागेल,' असा सल्ला सीए मुकेश हुंडीवाल यांनी दिला. प्रारंभी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अजय शहा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सीए असोसिएशनच्या अध्यक्षा रेणुका देशपांडे, टॅक्स प्रॉक्टिसर्स असोसिएशनचे अध्यक्ष विलास कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. राजन हौजवाला यांनी आभार मानले.

देशातील पहिलाच प्रयोग

जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अजय शहा यांनी सांगितले की, पाचशे व हजार रुपयांच्या नोटा व्यवहारातून बाद झाल्यानंतर सर्वत्र एकच खळबळ माजली. सर्वसामान्य जनता, व्यापारी, शेतकरी यांच्या मनात आपल्याकडील पै-पै जमा केलेल्या रकमासंदर्भात विविध शंका निर्माण झाल्या. त्यांच्या मनातील शंका, गैरसमज व त्यांच्यातील भीती दूर करण्यासाठी 'चर्चासत्र' घेण्यात आले. हे देशातील पहिलेच चर्चासत्र ठरले आहे.

वामन खाडिलकर : बालरोगतज्ज्ञांच्या राज्यस्तरीय परिषदेत मार्गदर्शन

बालकांच्या वाढीसाठी आता भारतीय निकष

औरंगाबाद : बालकांची सर्वांगीण वाढ, विकास आणि त्यांच्या आजारांच्या निदानासाठी भारतातील वातावरण, अनुवंशिकता आदींचा वापर होणे अत्यावश्यक आहे. यासंदर्भातील निकषांचे तक्ते यापूर्वी परदेशांत तयार झालेले होते. त्यांचा वापर हा भारतात प्रभावी ठरत नाही. त्यामुळे भारतीयांची सरासरी उंची, आहार, वातावरण आदी अनेक बाबींवर सखोल संशोधन करुन नवीन तक्ता तयार करण्यात आला. तो अत्यंत उपयुक्त ठरत आहे, असे प्रतिपादन डॉ. वामन खाडिलकर यांनी केले.

डॉ. खाडिलकर

इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्सच्या औरंगाबाद शाखेतर्फे आयोजित बालरोगतज्ज्ञांच्या राज्यस्तरीय परिषदेच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी डॉ. खाडिलकर यांचे बीजभाषण झाले. यावेळी ते बोलत होते. डॉ. खाडिलकर यांनी मुलांच्या सर्वांगीण विकासाचा भारतीय तक्ता तयार केला आहे. त्यास भारतीय बालरोगतज्ज्ञ परिषदेने २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. त्याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. वीस हजार मुलांचा अभ्यास करुन हा तक्ता तयार केला असून, त्याचा वापर आता देशात सर्वत्र होत आहे. या माध्यमातून मुलांमधील आंतरग्रंथींचे आजार, चुकीच्या आहारामुळे होणारे आजार आदी अनेक समस्यांवर वेळीच उपाययोजना शक्य होतात, असे ते म्हणाले. डायरियाच्या लसीसंदर्भात पुण्याचे डॉ. संजय ललवाणी तर न्यूमोनियाच्या लसीबाबत मुंबईचे डॉ. नितीन शाह यांनी मार्गदर्शन केले. औरंगाबादचे बालरोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश खडके यांनी पुरळ आणि ताप यावरील उपचार पद्धतीवर मार्गदर्शन केले.

यशस्वीतेसाठी अध्यक्ष डॉ. राजेंद्र वैद्य, सचिव डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. अभय जैन, डॉ. जयंत तुपकरी, डॉ. राजेंद्र खडके, डॉ. प्रशांत जाधव, डॉ. मंजूषा शेरकर, डॉ. रोशनी सोधी, डॉ. तृप्ती बोरुळकर, डॉ. गिरीश मोरे, डॉ. अभिजित जोशी, डॉ. मकरंद दिवाण, डॉ. समीर जोशी, डॉ. सचिन देशमुख, डॉ. विनोद येवले हे प्रयत्नशील आहेत.

स्टेमसेलची उपयुक्तता मर्यादित

स्टेमसेल थेरपीबाबत मुंबईचे डॉ. रशीद मर्चंट यांनी मार्गदर्शन केले. ही थेरपी थायलेसेमिया आणि रक्ताशी निगडित काही आजारांवर परिणामकारक सिद्ध झाली असली तरी तिच्यावर अजून खूप संशोधन होणे गरजेचे आहे. ज्या बालकाच्या नाळेमधून स्टेमसेल मिळविले जातात ते त्याला उपयोगी पडत नाहीत. स्टेमसेल प्रिझर्व्ह करण्यासाठी परदेशात शासन पातळीवर यंत्रणा उभ्या केल्या आहेत. भारतात मात्र खाजगी क्षेत्रात असून, ही खूप खर्चिक बाब आहे. प्रत्येक आजारावर स्टेमसेल थेरपी हा हमखास उपाय नाही, असेही ते म्हणाले.